दूरध्वनी क्र. ०२०/२६३३३७४३
Email ID-tes.trti-mh@nic.in

महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

www.trti.maharashtra.gov.in

**क्रमांक- संशोधन-२०२६/प्र.क्र.७२/का-४/ १९९२** **दिनांक: ६ एप्रिल, २०२६**

## अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरीता पीएच.डी पात्रता पुर्व परीक्षा शिकवणी DBT योजना

**(STRF-२०२६-२०२७)**

## अर्ज मागविण्याबाबत सूचना

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या पदव्युत्तर पदवी पुर्ण असलेल्या उमेदवारांसाठी पीएच.डी पात्रता पुर्व परीक्षा पुर्व शिकवणीसाठी सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात या योजनेच्या लाभासाठी निवड करण्यात येणार आहे.

त्याकरिता https://fellowship.trti-maha.in/ व https://trti.maharashtra.gov.in/ (टीआरटीआय प्रकल्प→ अधिछात्रवृत्ती) या संकेतस्थळावर योजनेचा सविस्तर तपशिल, मार्गदर्शक तत्वे,नियमावली,विविध नमुने व आवश्यक माहिती व ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. अर्जदार अनुसूचित जमातीचा असावा व अर्जदाराकडे अर्जाच्या दिनांकास अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र असावे.
३. उमेदवार हा पदव्युत्तर पदवीधारक(Post Graduate) असावा.
४. अनुसचित जमातीच्या उमेदवाराचे व त्याच्या कुटुंबाचे सर्व मार्गाने मिळुन वार्षिक उत्पन्न ८ लक्ष पेक्षा कमी असावे.
५. उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष इतकी असावी.
६. आदिम जमाती उमेदवारांना प्राधान्य् .
७. मुली व दिव्यांग या साठी अनुक्रमे ३०% व ४% जागा आरक्षित .
८. शासकीय सेवेतील उमेदवार लाभास अपात्र .
९. योजना कालावधीत उमेदवाराची ८० टक्के उपस्थिती अनिवार्य.
१०. निवड झालेल्या उमेदवारांने तात्काळ रुजु होणे बंधनकारक व ७ दिवसात हमीपत्र सादर करणे अनिवार्य.
११. अर्जदाराने https://fellowship.trti-maha.in/ या संकेतस्थळावर योजनेच्या प्रसिध्द करण्यात आलेल्या सविस्तर माहितीत नमुद अटी, शर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहील.
१२. या योजनेअंतर्गत अर्जदाराने शिकवणी संस्थेस प्रवेश घेतलेल्या दिनांकापासुन सहा महिने लाभ देय राहील.

**अर्ज सादर करण्याची मुदत** : दिनांक: १५/०४/२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक: २५/०४/२०२६ सायंकाळी ०६.०० या कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत. तद्नंतर येणारे अर्ज स्विकृत होणार नाहीत.

वरील अटी शर्ती व संकेतस्थळावरील तपशीलांचे अवलोकन करुन पात्रताधारक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी विहित मुदतीत सर्व कागदपत्रांसह संकेतस्थळावर अर्ज सादर करुन सदर अर्जाची सर्व कागदपत्रांसह एक प्रत एका फाईलमध्ये या कार्यालयास **३० एप्रील २०२६** पर्यंत पोस्टाव्दारे/समक्ष सादर करावी . योजनेच्या वरील अटी व शर्ती, प्रसिध्द तपशिलात योग्य तो बदल करण्याचा/ रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

**(मंजिरी मनोलकर भा.प्र.से)**
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**